# आनंदाचे गाणे

चला चला गाऊ चला आनंदाचे गाणे

आनंदाचे गाणे गाऊ आनंदाचे गाणे ||धृ||

फुलपाखरांचे पंख घेऊनी

उडू बागडू धुंद होऊनी

वाऱ्यासंगे नाचू चला छेडू या तराणे ||1||

फुलाफुलांचे रंग घेऊ या

झाडे जशी उंच तसे उंच होऊ या

हिरवे हिरवे रान सारे ,हिरवी हिरवी पाने ||2||

आभाळात काहीतरी नवे पाहू या

नवे नवे पाहताना नवे शोधू या

गीत नवे शब्द नवे गाऊ या नव्याने ||3||

आभाळात काहीतरी नवे पाहू या

नवे नवे पाहताना नवे शोधू या

गीत नवे शब्द नवे गाऊ या नव्याने ||4||